SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक १३ फेब्रवारी, २०२५

अधिसुचना

क्र. १७/२०२५ **दिनांक : १३/०२/२०२५**

विषय : आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रतिदिन प्रतीखेळाडू रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतका दैनिक भत्ता व आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्ग कालावधी दरम्यान राखीव खेळाडूंसह सहभागी होणाऱ्या स्थानिक व बाहेरगावातील खेळाडूंना प्रती दिन प्रती खेळाडू रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) इतका समसमान अल्पोपहार भत्ता प्रदान करण्याबाबत.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, दिनांक १५.०३.२०२३ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेत विषय क्रमांक १३(३) नुसार आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा दैनिक भत्ता तसेच प्रशिक्षक व व्यवस्थापकांचे मानधनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे मार्फत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याकरीता निर्णय घेण्यात आला होता.

सदर निर्णयानुषंगाने दैनिक भत्यात वाढ करण्याकरिता सदर विषय क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दिनांक ०६.०४.२०२४ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. १३ अन्वये सादर करण्यात येवून क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रतिदिन प्रतीखेळाडू **रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त)** इतका दैनिक भत्ता व आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्ग कालावधी दरम्यान राखीव खेळाडूंसह सहभागी होणाऱ्या स्थानिक व बाहेरगावातील खेळाडूंना प्रतिदिन प्रतीखेळाडू **रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त)** इतका समसमान अल्पोपहार भत्ता प्रदान करण्याबाबत वित्त व लेखा समितीमार्फत व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

उपरोक्तप्रमाणे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाद्वारे करण्यात आलेल्या शिफारसीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त होण्याकरिता दिनांक ०४.०७.२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समिती सभेत विषय क्रमांक १३ अन्वये **आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रतिदिन प्रतीखेळाडू रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) वरुन रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दैनिक भत्ता व प्रशिक्षण वर्ग कालावधी दरम्यान राखीव खेळाडूंसह सहभागी होणाऱ्या स्थानिक खेळाडूंना रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) वरुन तसेच बाहेरगावातील खेळाडूंना रुपये १५०/- (अक्षरी रुपये एकशे पन्नास फक्त) वरुन प्रती दिन प्रती खेळाडू रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) इतका समसमान अल्पोपहार भत्ता** प्रदान करण्याबाबत वित्त व लेखा समितीच्या शिफारसीनुसार व्यवस्थापन परिषदेने दिनांक १३.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. १९५ अन्वये मान्यता प्रदान केली असून त्यानुसार –

१) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रतिदिन प्रतीखेळाडू **रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त)** इतका दैनिक भत्ता शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासुन प्रदान करण्यात येईल.

२) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्ग कालावधी दरम्यान राखीव खेळाडूंसह सहभागी होणाऱ्या स्थानिक व बाहेरगावातील खेळाडूंना प्रतीदिन प्रती खेळाडू **रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त)** इतका समसमान अल्पोपहार भत्ता शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासुन प्रदान करण्यात येईल.

३) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रतिदिन प्रती खेळाडू **रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त)** इतकी दैनिक भत्त्यामध्ये वाढ करण्यास मान्यता प्रदान करण्यात आल्यानुसार यापुर्वी **रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त)** इतका दैनिक भत्ता प्रदान करण्याबाबत विद्यापीठ राजपत्र भाग-२ च्या पृष्ठ क्र. १०३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसुचना क्र.७४/२०१६ दिनांक २५.०८.२०१६ रद्द करण्यात येत आहे.

४) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्ग कालावधी दरम्यान राखीव खेळाडूंसह सहभागी होणाऱ्या स्थानिक व बाहेरगावातील खेळाडूंना प्रती दिन प्रती खेळाडू **रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त)** इतका समसमान अल्पोपहार भत्ता प्रदान करण्यास मान्यता प्रदान करण्यात आल्यानुसार यापुर्वी प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या अमरावती शहरात स्थित असलेल्या संलग्नित महाविद्यालयातून आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याच्यादृष्टीने निवड झालेले खेळाडू यांना प्रतिदिन प्रति खेळाडू **रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त)** व अमरावती शहराबाहेरील संलग्नित महाविद्यालयातून आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याच्यादृष्टीने निवड झालेले खेळाडू यांना प्रतिदिन प्रति खेळाडू **रुपये १५०/- (अक्षरी रुपये एकशे पन्नास फक्त)** इतका अल्पोपहार भत्ता प्रदान करण्याबाबत विद्यापीठ राजपत्र भाग-२ च्या पृष्ठ क्र. १२८ वर प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसुचना क्र.६९/२०१२ दिनांक १४.०६.२०१२ रद्द करण्यात येत आहे.

स्वा/-
(अविनाश असनारे)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ